# बोर्ड कृतिपत्रिका: जुलै 2019

# मराठी अक्षरभारती

**Time : 3 Hours** **Max. Marks : 100**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना:**

1. सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.
2. आकृत्या पेननेच काढाव्यात.
3. उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
4. विभाग 5-उपयोजित लेखन प्र. 5 (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.
5. स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग 1 – गद्य

### पठित गद्य

**1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

**1. का ते लिहा:** **[2]**

i. दुसऱ्या मुलांच्या हातात खेळणी पाहून लेखकाला लहानपणी त्यांचा हेवा वाटत असे.

ii. दिवसभर खेळून घरात पाऊल ठेवताच लहानपणी लेखकाच्या पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा.

माझ्या बालमित्रांनो, मी तुमच्याएवढा होतो तेव्हा अगदी तुमच्यासारखाच खेळकर, खोडकर व उपद्व्यापी होतो! माझा जन्म पुण्यातच एका गरीब कुटुंबात झाला. माझे वडील त्या वेळेस पोलीसखात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते. तेव्हा साहजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दु:खे आम्ही भोगत होतो. अशा परिस्थितीत वडिलांना आम्हां मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्यच नव्हते. दुसऱ्या मुलांच्या हातात खेळणी पाहून आम्हांला त्यांचा हेवा वाटत असे. तरी पण गल्लीतील मुलांना जमा करून उन्हातान्हात विटीदांडू खेळणे, पतंग उडवणे, कधीमधी कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे; कैऱ्या, पेरू पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे, घरात जळणासाठी आणलेल्या लाकडांतूनच बॅट व स्टंप तयार करणे व कुठून तरी जुना पुराणा बॉल पैदा करून क्रिकेट खेळणे असा माझा दिवसभराचा कार्यक्रम असायचा. संध्याकाळी घरी येईपर्यंत माझ्याबद्दल बऱ्याच तक्रारी आईच्या कानांवर आलेल्या असायच्या. दिवसभराच्या खेळाने भूक तर खूपच लागलेली असायची. घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा. मग मी घरात एका कोपऱ्यात जाऊन रडत बसायचा! तिथेच झोप लागायची आणि जाग यायची ती आईच्या प्रेमळ कुशीत.

**2. आकृतिबंध पूर्ण करा:**

i. **[1]**

लेखकाची लहानपणची गुणवैशिष्ट्ये → ☐ ☐

ii. **[1]**

लहानपणीचा लेखकाचा दिवसभरचा कार्यक्रम → ☐ ☐

**3. व्याकरण कृती:**

**i. पुढील शब्दांसाठी उताऱ्यात आलेले प्रतिशब्द लिहा:** **[1]**

अ. मेहनत → ☐ ब. निद्रा → ☐

ii. **खालील शब्दांचे वचन बदला:** **[1]**

अ. कैऱ्या → [ ] ब. लाडू → [ ]

4. **स्वमत:** **[2]**

उताऱ्याच्या आधारे 'लेखकाचे बालपण' तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **[2]**

1. **वर्णन करा:**

**सुश्रुतचे स्वप्न**

सुश्रुतच्या वर्गाची सहल भिलार या पुस्तकांच्या गावाला नेण्याचे ठरले. वर्गात सूचना आली. दुसऱ्या दिवशी शिक्षकांनी भिलार या गावाची माहिती सांगितली. त्याबाबत एक फिल्म दाखवली. सुश्रुतला ते खूप आवडले. घरी परतल्यावर तो सहलीला जाणार म्हणून आनंदाने झोपला.

काही वेळाने त्याला जाणवले, की काही पुस्तके मुलामुलींचा वेश करून आणि हातात हात घालून आनंदाने गाणी गात आहेत, नाचत आहेत. एवढंच नाही तर त्याला उठवतही आहेत. सुश्रुत झोपेतच म्हणाला "कोण रे तुम्ही, इथे काय करत आहात?" पुस्तकाच्या वेशातील मुले सुश्रुतला म्हणाली, "अरे आम्ही सर्व तुला भेटायला आलो आहोत. आम्हांला तुझ्याशी मैत्री करायची आहे."

सुश्रुत : तुम्ही सगळे कोण आहात?

कथा : अरे, असा घाबरतोस काय? हे सगळे आपलेच मित्र आहेत. सगळ्यांशी चांगली मैत्री होईल तुझी. माझी ओळख तर तुला लहानपणापासूनच आहे. अरे, मी आहे कथा. गोष्ट हे माझंच दुसरं नाव.

सुश्रुत : आपली ओळख कशी काय?

कथा : आईच्या, आजीच्या तोंडून इसापनीती, पंचतंत्र, अकबर-बिरबल अशा गोष्टी ऐकत ऐकत तुम्हांला मला वाचायची सवय लागते ना!

सुश्रुत : होऽऽ आता आठवलं आजी मला नेहमी कोल्हा, उंदीर, ससा-कासव यांच्या गोष्टी सांगायची.

कथा : बरं का सुश्रुत! आकर्षक सुरुवात आणि परिणामकारक शेवट ही माझी वैशिष्ट्ये.

2. **चौकटी पूर्ण करा:** **[2]**

i. पुस्तकांचे गाव – [ ]

ii. सहलीला जायच्या आनंदात झोपलेला – [ ]

iii. मुलामुलींचा वेश घेतलेली – [ ]

iv. गोष्टीचे दुसरे नाव – [ ]

3. **व्याकरण :**

**खालील शब्दांचे लिंग बदलून त्यांचा वाक्यांत उपयोग करा:** **[2]**

i. शिक्षिका ii. मुलगा

4. **स्वमत:** **[2]**

पुस्तकांशी मैत्री करण्याचे फायदे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

## अपठित गद्य

**(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **[2]**

1. **योग्य जोड्या लावा:**

| क्र. | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | पहाटे फुलणारा | अ. | शेतकरी |
| ii. | कामाचे नियोजन न करणारी | ब. | रातराणी |
| iii. | काळोखात डवरणारी | क. | आळशी व्यक्ती |
| iv. | पेरणी करणारे | ड. | पारिजातक |

वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे. म्हणून वेळेचा उपयोग समजूतदारपणे केला पाहिजे. वेळेचा वेग किती आहे? वेळेसोबत आपल्याला चालता येईल का? कोणीही सांगू शकत नाही. पण जो वेळेचे भान बाळगतो, तो वेळेसोबत सहज चालू शकतो. मात्र वेळेचे महत्त्व ओळखले पाहिजे. वेळेचे नियोजन केले पाहिजे. मग दैनंदिन कामे व्यवस्थित पार पडतात. शिवाय इतर गोष्टींसाठी भरपूर वेळ मिळतो. अशी माणसे अनेक छंद जोपासतात. घरी परतल्यावर दीड-दोन तास वाचन करू शकतात. काहीजण संगीताचा आस्वाद घेतात. काहीजण संध्याकाळचा फेरफटका मारतात. तर काहीजण कुटुंबियांसोबत गप्पागोष्टी करतात.

वेळ नाही, ही सबब आळशी माणसे देतात. ही माणसे कामाचे नियोजन करीत नाहीत. त्यामुळे त्यांची कामे वेळेवर पार पडत नाहीत. त्यांना अपयश येते. शिवाय, त्यांना मोकळा वेळही मिळत नाही.

जीवनात वेळेला किती महत्त्व आहे, हे वेळेवर कळले पाहिजे. आळस केला, वेळ टळली, तर सगळेच हातचे जाते. शेतकऱ्याने आपल्या सवडीप्रमाणे पेरणी केली, तर काय होईल? परीक्षेचे वेळापत्रक आठवणीत राहिले नाही, तर सगळे वर्ष जाईल. पारिजातक पहाटे फुलतो, रातराणी काळोखात डवरते, चांदणे केव्हा पडावे, काळोख कधी दाटावा, हे ठरलेले आहे.

**2. प्रत्येकी एका वाक्यात उत्तर लिहा:** **[2]**

i. वेळेवर काय कळायला हवे?

ii. 'वेळ नाही' ही सबब केव्हा दिली जाते?

**3. व्याकरण:**

**खालील नामांसाठी उताऱ्यात आलेली योग्य विशेषणे शोधून लिहा:** **[2]**

i. ..................... कामे

ii. ..................... गोष्ट

iii. ..................... माणसे

iv. ..................... छंद

**4. स्वमत:** **[2]**

तुम्हांला कळलेले वेळेचे महत्त्व सोदाहरण लिहा.

## विभाग 2 – पद्य

**2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

**1. i. आकृतिबंध पूर्ण करा:** **[1]**

| चकोरांसी | ← **ज्याप्रमाणे योगी पुरुषाचे मृदुत्व सर्वांशी त्याप्रमाणे** → | पिलियांसी |
|---|---|---|
| ☐ | | ☐ |

**ii. उदाहरण लिहा:** **[1]**

'योगी सर्वकाळ सुखदाता' याचे कोणतेही एक उदाहरण प्रस्तुत अभंगाच्या आधारे लिहा.

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी ।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व।।

जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।

उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।

उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां।
योगियांचे गोडपण पाहतां। होय निववित सर्वेंद्रियां ।।

मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण।
अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।

तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।

2. **तक्ता पूर्ण करा:**
**योगी पुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा:** **[2]**

| क्र. | योगी पुरुष | जीवन (पाणी) |
|---|---|---|
| i. | ..................... | ..................... |
| ii. | ..................... | ..................... |

3. **खालील ओळीतील तुम्हांला समजलेला विचार तुमच्या शब्दांत लिहा:** **[2]**
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निववित सर्वेंद्रियां ।।

4. **खालील ओळीतील आशय तुमच्या शब्दांत लिहा:** **[2]**
मेघमुखें अध:पतन। उदकाचें देखोनि जाण ।
अध:पातें निवती जन। अन्नदान सकळांसी ।।

**(आ) खालील मुद्द्यांना अनुसरून कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा:**
**'दोन दिवस' किंवा 'हिरवंगार झाडासारखं'**

1. प्रस्तुत कवितेचे कवी/ कवयित्री – **[1]**
2. कवितेचा रचनाप्रकार – **[1]**
3. कवितेचा काव्यसंग्रह – **[1]**
4. कवितेचा विषय – **[1]**
5. कवितेतून व्यक्त होणारा विचार – **[2]**
6. कवितेतून मिळणारा संदेश – **[2]**

**(इ) खालील ओळींचे रसग्रहण करा:** **[4]**
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.

## विभाग 3 – स्थूलवाचन

3. **खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा:** **[6]**

1. टीप लिहा:

   सग्वारो कॅक्टस

2. व्युत्पत्ती कोशाचे कार्य तुमच्या शब्दांत लिहा.
3. 'जाता अस्ताला' या कवितेतील पणतीच्या उदाहरणातून व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

## विभाग 4 – भाषाभ्यास

**4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :** **[2]**

**1. समास:**

**तक्ता पूर्ण करा:**

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| i. | चांगलेवाईट | | |
| ii. | आजन्म | | |

**2. अलंकार:** **[2]**

**खालील उदाहरण वाचून कृती करा:**

रेहानाचे अक्षर मोत्याप्रमाणे सुंदर आहे.

वरील उदाहरणातील :

| | | |
|---|---|---|
| i. | उपमेय | ..................... |
| ii. | उपमान | ..................... |
| iii. | समानगुणधर्म | ..................... |
| iv. | अलंकार | ..................... |

**3. वाक्य रूपांतर:** **[2]**

**खालील वाक्यांचे प्रकार ओळखून सूचनेप्रमाणे कृती करा:**

i. किती सुंदर आहे ताजमहाल ! → प्रकार .....................

विधानार्थी करा → 

ii. प्रवासात भरभरून बोलावे → प्रकार .....................

आज्ञार्थी करा → 

**4. सामान्यरूप:** **[2]**

**अधोरेखित शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती प्रत्यय लिहून तक्ता पूर्ण करा:**

आमच्या <u>शाळेने</u> <u>शेतकऱ्यांचा</u> सन्मान केला.

| क्र. | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|
| i. | शाळेने | | |
| ii. | शेतकऱ्यांचा | | |

**5. वाक्प्रचार:**

**कंसातील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा:** **[2]**

(हेवा वाटणे, खूणगाठ बांधणे, नाव उज्ज्वल करणे)

i. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सम्यकने बुद्धिबळ खेळात शाळेचे नाव उंचावले.

ii. मधुराने म्हटलेल्या गाण्याचे सर्वांनी केलेले कौतुक ऐकून मला क्षणभर तिचा मत्सर वाटला.

(आ) भाषासौंदर्य:

1. शब्दसंपत्ती:

**i. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:** [1]

अ. रणांगणावर आलेले मरण – ☐

ब. समाजाची सेवा करणारा – ☐

**ii. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा:** [1]

अ. सुरुवात × ☐

ब. शक्य × ☐

**iii. गटात न बसणारा शब्द ओळखा:** [1]

अ. मोगरा, भोवरा, चाफा, झेंडू – ....................

ब. वृक्ष, पिंपळ, वड, चिंच – ....................

**iv. खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा:** [1]

(वन व रक्षक ते शब्द वगळून)

☐ ← वनरक्षक → ☐

2. लेखननियमांनुसार लेखन :

**i. खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा:** [1]

बांगड्यांची पेटी व पीशवी तु हातात घे.

**ii. अचूक शब्द ओळखा:** [1]

अ. सांस्कृतीक / सांस्कृतिक / सास्कृतिक / संस्कृतिक

ब. कनिष्ठ / कनिष्ट / कनीष्ठ / कनीष्ट

3. विरामचिन्हे:

**खालील वाक्यातील विरामचिन्हांची नावे लिहा:** [2]

"बाबा, पाच-सहा दिवसांपूर्वी मी तुम्हांला दोन शाली दिल्या होत्या. आठवते?"

| क्र. | विरामचिन्हे | नावे |
|---|---|---|
| i. | " " | |
| ii. | , | |
| iii. | . | |
| iv. | ? | |

4. पारिभाषिक शब्द:

**खालील पारिभाषिक शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा:** [1]

i. Comedy – ☐

ii. Agent – ☐

5. भाषिक खेळ:

**'जगमय' सारखे दोन शब्द लिहा:** [1]

i. ☐

ii. ☐

## विभाग 5 – उपयोजित लेखन

**5. (अ) खालील कृती सोडवा:**

**1. पत्रलेखन:** **[5]**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा:**

**'स्वच्छता हीच देशसेवा'**

ज्ञानसंपदा विद्यालय, अकोला

स्वच्छता सप्ताहानिमित्त विशेष कार्यक्रम

दि. 2 ऑक्टोबर

वेळ स. 9:00

'शालेय परिसर स्वच्छता'

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

← **किंवा** →

स्वच्छता करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी करणारे पत्र तुमच्या शाळेतील ज्येष्ठ सेवकांना लिहा.

**2. सारांशलेखन:** **[5]**

विभाग 1 – गद्य (इ) (प्र. क्र. 1–इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालील कृती सोडवा.**

**1. बातमीलेखन:** **[6]**

**खालील मुद्दे वाचा व त्याखालील कृती सोडवा:**

28 फेब्रु.

**शारदा विद्यालय**

स. 9 ते 5

बजाज नगर, भंडारा

'विज्ञानदिन' सोहळा

विज्ञानदिनानिमित्त

वैज्ञानिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन

- **उद्घाटक – डॉ. श्री. विलास बोधनकर, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख,**

(डी. पी. महाविद्यालय, भंडारा)

भंडारा येथील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी

प्रदर्शनास भेट दिली.

विज्ञान दिनानिमित्त आयोजित प्रदर्शन सोहळ्याची बातमी तयार करून लिहा.

2. **कथालेखन :** **[6]**

**खालील अपूर्ण कथा वाचा, तुमच्या विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा:**

(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)

कोकणातल्या भर पावसात आम्ही सर्व नातेवाईक दापोलीला सहलीला निघालो होतो. वरंधा घाटातले धबधबे डोळ्यांत साठवत, निसर्गसौंदर्य कॅमेऱ्याने टिपत सर्वजण धमाल करत होते. गरम-गरम बटाटेवडे खायची सर्वांना इच्छा झाली. ड्रायव्हरला गाडी थांबवायची सूचना केली आणि ....................................................................................


**(इ) लेखनकौशल्य:**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा:** **[8]**

1. **प्रसंगलेखन:**

| |
|---|
| **– आदर्श मंडळ –** |
| – योगासने प्रात्यक्षिक स्पर्धा – (8 ते 12 वयोगटांसाठी) |
| पारितोषिक वितरण समारंभ |
| दि. 2 जानेवारी सकाळी 9 : 00 |
| प्रमुख पाहुणे – श्री. उदय जैन |
| अध्यक्षा – श्रीमती अनुराधा रेगे |
| वरील समारंभ प्रसंगी तुम्ही तुमच्या लहान भावाचे/बहिणीचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा. |

2. **आत्मवृत्त:**




वरील चौकटीत दिलेल्या घटकाचे आत्मवृत्त लिहा.